25 FEB 2026

पुढारी

# संशोधनासाठी निधीप्राप्ती संशोधकाच्या विश्वासार्हतेची कसोटी : डॉ. रायचूर

कोल्हापूर : संशोधनासाठी निधी मिळवणे ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती संशोधकाच्या कल्पकतेची, विश्वासार्हतेची व नियोजनक्षमतेची कसोटी असते, असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथील शास्त्रज्ञ डॉ. अशोक रायचूर यांनी केले. संशोधन प्रकल्पांसाठी निधी मिळवण्याच्या विविध संधी, त्या निधीचा पारदर्शक आणि परिणामकारक वापर तसेच संशोधनातील नैतिकता याविषयी संशोधकांना मार्गदर्शनासाठी शिवाजी विद्यापीठ येथे विशेष कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रायचूर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. डॉ. रायचूर म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात संशोधनासाठी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. मात्र, त्यासाठी संशोधकांनी दर्जेदार प्रस्ताव तयार करण्याची आणि निधीचा परिणामकारक वापर करण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. टी. ए. अभिनंदन, डॉ. विक्रम जयराम, डॉ. रोहित कुमार यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के.डी. कुचे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किरण पवार यांनी आभार मानले.

25 FEB 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माजी विद्यार्थ्यांचा 'सीड बॉलचा' संकल्प

## शिक्षणशास्त्र अधिविभागात माजी विद्यार्थी व पालक मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभागात माजी विद्यार्थ्यांचा सत्कार यंदा पर्यावरणपूरक व अभिनव पद्धतीने करण्यात आला. निसर्ग व जैवविविधता संवर्धनाच्या दृष्टीकोनातून 'बीजसंग्रह' हा उपक्रम राबविण्यात आला. विविध वनस्पतींच्या बियांची साठवणूक करण्यासाठी विशेष पेटी तयार करण्यात आली असून त्यातून 'सीड बॉल्स' तयार करून गरजू भागांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

- **निसर्ग मंडळाचे उद्घाटन, 'बीजसंग्रह' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश**

शिवाजी विद्यापीठ येथील शिक्षणशास्त्र अधिविभागात माजी विद्यार्थी व पालक मेळावा तसेच विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमास अधिविभागातील विविध शैक्षणिक वर्षांतील माजी विद्यार्थी ऑनलाइन व प्रत्यक्ष स्वरूपात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच एम.एड., बी.एड., एम.एड. (एकात्मिक) व बी. एस्सी. बी.एड. अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते. यावेळी अधिविभागात 'निसर्ग मंडळाचे' उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग संवर्धन व जैवविविधतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.याच अनुषंगाने बीजमाता पद्मश्री विजेत्या राहीबाई पोपेरे यांच्याकडून १४ प्रकारच्या विविध प्रजातींच्या बिया मागविण्यात आल्या आहेत.

अधिविभागास भेट देण्प्रया प्रमुख पाहुण्यांना, माजी विद्यार्थ्यांना व पालकांना या बियांची पोटली तसेच टाकाऊ कागदापासून तयार केलेली फुले देऊन सत्कार करण्याची संकल्पना यावेळी प्रत्यक्षात उतरविण्यात आली. अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य व इतर सादरीकरणांच्या माध्यमातून आपली कला सादर केली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. रुपाली संकपाळ यांनी केले. पालक व विद्यार्थ्यांशी संवाद डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी साधला. सूत्रसंचालन प्रशिक्षणार्थी ऐश्वर्या मरूथूवर व राजनंदिनी यांनी केले, तर आभार प्रशिक्षणार्थी राहुल माने यांनी मानले. या कार्यक्रमास माजी प्राचार्य एम. व्ही. शेख, प्रदीप पाटील, प्रमोद तांदळे, नगीना माळी, अफसाना मणेरी, उमेश बेनके, अनिजा सूर्यवंशी, रुपाली भारमल, धीरज घाडगे यांच्यासह अधिविभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
ावाजी विद्यापीठ. कोल्हापूर

25 FEB 2026 पुण्यनगरी

# 'एआय'साठी ॲप्लिकेशन, मॉडेल, डाटा सेंटर, ऊर्जेची गरज


## डॉ. आर. व्ही. गुरव; आजरा महाविद्यालयात 'एआय' विषयावर राष्ट्रीय परिषद

**आजरा : प्रतिनिधी**

आजरा महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि त्याचे जीवविज्ञानामधील उपयोजन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ. अनिल देशपांडे होते.

परिषदेचे उद्‌घाटन जनता एज्यु. सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे व शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर व्ही. गुरव यांच्या हस्ते झाले.

उद्‌घाटनप्रसंगी डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, इतर विषयांचे ज्ञान असेल, तरच आर्टिफिशियल इंटेलिजनसचा उपयोग करता येईल. संगणकामुळे असंख्य नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत. आपल्या देशामध्ये तरुणांची संख्या खूप आहे, कोणतेही शासन असले तरी सर्वांना नोकऱ्या देणे शक्य नाही. तरुणांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करून नोकऱ्या




निर्माण केल्या पाहिजेत. आर्टिफिशियल इंटेलिजनसाठी अप्लिकेशन, मॉडेल, डाटा सेंटर व ऊर्जेची गरज आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. ए. एन. सादळे यांनी केले.

राष्ट्रीय परिषदेच्या पहिल्या सत्रामधील संसाधन व्यक्ती, शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी नैसर्गिक बुद्धिमत्तेला कृत्रिम बुद्धिमत्ता हा कधीही पर्याय होऊ शकत नाही, असे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रामध्ये संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. कबीर खराडे यांनी 'अक्सेलरेटिंग लाईफ सायन्स यूजिंग आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयावर विस्तृतपणे मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रामध्ये विविध महाविद्यालयांतून आलेल्या संशोधकांनी आपल्या संशोधन लेखाचे वाचन केले. आजरा महाविद्यालयातील विद्यार्थी सुजल बोलके हिने भात पिकावर पडणाऱ्या रोगाचे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या सहाय्याने 'रोग निदान व उपचार' या विषयावर शोध निबंध सादर केला.

राष्ट्रीय परिषद पार पाडण्यासाठी सेक्रेटरी डॉ. विनायक आजगेकर, समन्वयक डॉ. राजीव करपे, स्वप्नील जाधव व डॉ. तानाजी कावळे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

राष्ट्रीय परिषदेसाठी जनता एज्यु. सोसायटीचे संचालक विजयकुमार पाटील, के. व्ही. येसणे, कार्यालयीन अधीक्षक योगेश पाटील, संशोधक डॉ. लाझुरस लंका, डॉ. उदय पाटील, विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

2 5 FEB 2026
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सात प्रकारांच्या शीळ वादनाने श्रोते थक्क

## विद्यापीठात रंगला श्रीकांत काजवे यांचा कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पकर, पॅलेटल, थ्रोट, बॉटम लिप, टीथ आणि हँड-फिंगर व्हिसल अशा सात प्रकारांच्या अनोख्या शीळ वादनाने श्रीकांत काजवे यांनी श्रोत्यांना अक्षरशः थक्क केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाने मंगळवारी आयोजित केलेल्या 'शब्द-सूर' कार्यक्रमात इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स विजेते काजवे यांनी शीळ वादनाचे तांत्रिक पैलू उलगडले. काजवे यांनी शास्त्रीय संगीत आणि जुन्या हिंदी गाण्यांचे बहारदार सादरीकरण करत कार्यक्रम रंगतदार केला. काजवे यांनी या



श्रीकांत काजवे

कलेमागील शास्त्र समजावून सांगत शीळ वादनात पोट, ओठ आणि जीभ यांचा वापर, रियाज आणि त्याचे शारीरिक फायदे याची सविस्तर माहिती दिली. ही कला जोपासण्यासाठी आवश्यक असलेली 'हम प्रोसेस' तसेच 'ब्रेन योगा' आणि ध्यान यांची प्रात्यक्षिकेही त्यांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतली.

कार्यक्रमात भूप रागातील तराणा व सरगमगीत सादर करून त्यांनी शास्त्रीय संगीतातील पकड दाखविली. याशिवाय 'जब दीप जले आना', 'चंदनसा बदन' आणि 'सायोनारा' या गाण्यांच्या शीळ वादनाने वातावरणात विशेष रंगत निर्माण झाली. माधुरी काजवे यांनी निवेदन केले. संवादिनीवर अमित साळोखे आणि तबल्यावर संदेश गावंदे यांनी साथ दिली. प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्तविक केले. अतुल परीट यांनी आभार मानले.

## पक्ष्यांच्या हुबेहूब आवाजाला मिळाली दाद

पकर व्हिसलद्वारे 'अमेरिकन रेड स्टार्ट' पक्ष्यांचा आवाज, हँड व्हिसलने स्टीम इंजिनचा आवाज, तर फिंगर व्हिसलद्वारे 'पावशा' पक्ष्याचा आवाज हुबेहूब काढून काजवे यांनी उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

2 5 FEB 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी ऐकली सात प्रकारची शिट्टी

## श्रीकांत काजवे यांचे सादरीकरण; विद्यापीठात संगीत-नाट्यशास्त्र अधिविभागात कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या 'शब्द-सूर' या कार्यक्रमात इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस्‌चे विजेते श्रीकांत काजवे यांनी त्यांच्या अनोख्या शीळ वादनाने विद्यार्थी, श्रोत्यांना थक्क केले. त्यांनी शास्त्रीय संगीत आणि जुन्या हिंदी गाण्यांचे बहारदार सादरीकरण केले.

काजवे यांनी शीळ वादनाचे तांत्रिक पैलू उलगडताना पकर, प्यालेटल, थ्रोट, बॉटम लिप, टीथ आणि हँड-फिंगर व्हिसल अशा एकूण सात प्रकारच्या शिट्टी वादनाचे प्रात्यक्षिकासह सादरीकरण केले. यामध्ये पकर व्हिसलद्वारे अमेरिकन रेड स्टार्ट पक्ष्याचा आवाज, हँड व्हिसलद्वारे स्टीम इंजिनचा आवाज, फिंगर व्हिसलद्वारे पावशा पक्ष्याचा आवाज हुबेहूब काढून त्यांनी उपस्थितांची दाद मिळवली. काजवे यांनी शीळ वादनात पोट, ओठ आणि जीभ यांचा वापर कसा होतो.

या कलेचा रियाज कसा करावा आणि त्याचे शारीरिक फायदे काय आहेत, याची माहिती दिली. ही कला जोपासण्यासाठी आवश्यक असलेली हम प्रोसेस आणि ब्रेन योगा, ध्यान यांची प्रात्यक्षिके त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून करून घेतली.



संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातील 'शब्द-सूर' या कार्यक्रमात श्रीकांत काजवे यांनी शीळ वादन केले.

जनसंपर्क कक्ष
25 FEB 2026 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# काजवेंच्या शीळवादनाने श्रोते मंत्रमुग्ध

## शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'शब्द-सूर' या कार्यक्रमात केलेल्या अनोख्या शीळवादनाने उपस्थित श्रोत्यांना थक्क केले. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स विजेते श्रीकांत काजवे यांनी सादर केलेल्या एकापेक्षा एक अनोख्या शीळवादनाने श्रोत्यांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले.

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी दुपारी श्रीकांत काजवे ांच्या शीळवादनाचा हा बहारदार कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात श्रीकांत काजवे यांनी शास्त्रीय संगीत आणि जुन्या हिंदी गाण्यांचे सुंदर आणि बहारदारपणे सादरीकरण केले. श्रीकांत काजवे यांनी शीळ वादनाचे तांत्रिक पैलू उलगडताना पकर, प्यालेटल, थ्रोट, बॉटम लिप,



**कोल्हापूर : कार्यक्रमात शीळवादन सादर करताना श्रीकांत काजवे.**

शास्त्रही समजावून सांगितले. शीळ वादनात पोट, ओठ आणि जीभ यांचा वापर कसा होतो, या कलेचा रियाज कसा करावा आणि त्याचे शारीरिक फायदे काय आहेत, याची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

विशेष म्हणजे, ही कला जोपासण्यासाठी आवश्यक असलेली प्रोसेर्स आणि ब्रेन योगा, ध्यान यांची प्रात्यक्षिके त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून करून घेतली. कार्यक्रमात भूप रागातील तराणा आणि सरगमगीत सादर करून त्यांनी शास्त्रीय संगीतातील आपली पकड सिद्ध केली. याशिवाय 'जब दीप जले आना', 'चंदनसा बदन' आणि 'सायोनारा' यांसारख्या सदाबहार जुन्या गाण्यांच्या शिळ वादनाने वातावरणात रंगत भरली.

माधुरी काजवे यांनी निवेदन केले. कार्यक्रमाला संवादिनीवर अमित साळोखे यांनी तर तबल्यावर संदेश गावंदे यांनी उत्तम साथसंगत केली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. अतुल परीट यांनी व आभार मानले. यावेळी अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थी आणि रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

25 FEB 2026

लोकमत

# म. सु. पाटील वैश्विक दृष्टिकोनाचे समीक्षक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. म. सु. पाटील यांची समीक्षा व्रतस्थ आहे. ते वैश्विक दृष्टिकोन स्वीकारलेले समीक्षक होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप धोंगडे यांनी मंगळवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठ मानव्यशास्त्र सभागृहात मराठी विभाग, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन व नव-अनुष्टुभ प्रतिष्ठान, येवला यांच्यातर्फे 'डॉ. म. सु. पाटील यांचा समीक्षा विचार' विषयावर चर्चासत्र व पुरस्कार वितरण समारंभ झाला.

डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. डॉ. म. सु. पाटील यांच्या कन्या नीरजा प्रमुख उपस्थित होत्या. डॉ. प्रवीण बांदेकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अशोक केळकर मराठी भाषा पुरस्काराबद्दल प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांचा सत्कार डॉ. राजन गवस यांच्या हस्ते झाला. नव-अनुष्टुभ प्रतिष्ठानच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले.

25 FEB 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला सुरुवात

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते उद्घाटन : संचलनातून विद्यार्थ्यांची दिसली कल्पकता, अडीच हजार विद्यार्थी खेळणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध विभागांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाला मंगळवारी सुरुवात झाली. क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलात सलग चार दिवस सुरू होणाऱ्या महोत्सवाचे प्रभारी प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, व्यवस्थापन समिती सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य ॲड. अजित पाटील, ॲड. अभिषेक मिठारी श्वेता परुळेकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, शिवाजी विद्यापीठ कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष आनंद खामकर, डॉ. राहूल माने व सुभाष कोंबडे प्रा. सुचय खोपडे आदी उपस्थित होते. दरम्यान, शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठातील ३४ विभागांमधील अडीच हजार विद्यार्थी–विद्यार्थीनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व करणार आहेत. शिवस्पंदन उद्घाटनानंतर सर्वच विभागांमधील खेळाडूंनी संचलन केले. यात प्रेरणादायी थीम घेऊन विविध प्रकारची प्रात्यक्षिकेही सादर केली.

संचलनात महिला सबलीकरण, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्व क्षेत्रांमधील महिलांचा सहभाग, आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंचा सहभाग, विज्ञान व तंत्रज्ञानात संशोधकांनी घेतलेली आघाडी,



**कोल्हापूर : महोत्सवात मल्लखांबचे थरारक प्रात्याक्षीक सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.**


आजच्या मोबाईलच्या युगामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे महत्व आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या थीम लक्षवेधी ठरल्या. बुधवार, २५ रोजीपासून मैदानी स्पर्धांसह क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ व्हॉलीबॉल, थ्रोबॉल, रस्सीखेच या स्पर्धेचे वेगवेगळ्या क्रीडांगणांवर सामने खेळवण्यात येतील. क्रीडा व शारीरिक अधिविभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तसेच यावेळी क्रीडा विभागातील खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर केलेल्या विशेष कामगिरीची माहितीही डॉ. बनसोडे यांनी सांगितली. प्रा. किरण पाटील सुत्रसंचालन केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी आभार मानले.

### मोबाईलचा अतिवापर टाळा...

शिवस्पंदनच्या उद्घाटनानंतर बोलताना प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, शिवस्पंदन क्रीडा महोत्सवामुळे विद्यापीठातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थीनींना मैदान गाजण्याची संधी मिळवून देत आहे. शिवाय शिवस्पंदनमध्ये खेळलेले खेळाडू राज्य, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करत आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. विद्यापीठातीलच नव्हे तर शाळा, महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्वच खेळाडूंनी मोबाईलचा अतिवापर टाळून आपआपल्या खेळाचा कसून सराव करावा. आपले शारीरिक आरोग्य चांगले ठेवून क्रीडा स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व करावे, असे आवाहनही डॉ. जाधव यांनी यावेळी केले.

जनसंपर्क कक्ष
25 FEB 2026
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात मंगळवारी खेळाडूंनी ॲथलेटिक्स आणि मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर केली.

# 'शिवस्पंदन' क्रीडा महोत्सवास प्रारंभ; अडीच हजार खेळाडूंनी घेतला सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या 'शिवस्पंदन' या वार्षिक क्रीडा महोत्सवास मंगळवारी शानदार प्रारंभ झाला. येथील क्रीडा महर्षी मेघनाथ नागेश्वर क्रीडा संकुलामध्ये या स्पर्धेचे उद्घाटन प्रभारी प्र.कुलगुरू प्रा.डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. यात विद्यापीठाच्या ३४ विभागांमधील अडीच हजार खेळाडूंचा सहभाग आहे. चार दिवस चालणाऱ्या महोत्सवात क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल, थ्रोबॉल, रस्सीखेच या क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

ही स्पर्धा खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय पातळी गाठण्याची सुवर्णसंधी आहे, असे प्रतिपादन डॉ. ज्योती जाधव यांनी उद्घाटन समारंभात केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव,



शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवास मंगळवारी प्रारंभ झाला. यावेळी भारोत्तलन संघाशी हस्तांदोलन करून डॉ. ज्योती जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

व्यवस्थापन समिती सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य ॲड. अजित पाटील, ॲड. अभिषेक मिठारी, श्वेता परुळेकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, आनंद खामकर उपस्थित होते. विद्यापीठाच्या विविध विभागांनी संचालनात सहभाग घेतला.

डॉ. प्रशांत पाटील, डॉ. एन. आर. कांबळे, डॉ. धनंजय पाटील, डॉ. राहुल मगदूम यांनी नियोजन केले. क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुचय खोपडे, प्रा. राम पवार, कृष्णात पाटील, सुभाष पवार, मनीषा शिंदे, डॉ.राहुल माने, डॉ. नवनाथ वळेकर, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

25 FEB 2026

सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठ : ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील यांना 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी शेजारी डॉ. व्ही. एन. शिंदे, लेखिका नीरजा, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील मराठी साहित्याच्या पिकाचे राखणदार

## डॉ. राजन गवस : विद्यापीठात डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराचे वितरण

कोल्हापूर, ता. २४ : 'ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील हे मराठी साहित्याच्या पिकाचे राखणदार आहेत. खेड्यापाड्यातील लिहित्या मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. अफाट वाचनामुळे साहित्याविषयीची त्यांची भूमिका पक्की होती', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ समीक्षक पाटील यांना डॉ. गवस यांच्या हस्ते डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. यावेळी दिवंगत डॉ. म. सु. पाटील यांच्या कन्या व लेखिका नीरजा प्रमुख उपस्थित होत्या.

ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील म्हणाले, 'माणसांवर प्रेम करणाऱ्या समीक्षक म. सु. पाटील यांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार मला मिळणे हे गौरवास्पद आहे. नव्याने लिहिणाऱ्यांनी आपला आत्मा गहाण न टाकता समग्र अवकाशाविषयी जागरूकतेने लिहिले पाहिजे.'

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'पुस्तक परीक्षणाच्या पातळीवरील समीक्षेपेक्षा सैध्दांतिक पातळीवरील पातळीची समीक्षा चंद्रकांत पाटील यांची आहे.' यावेळी डॉ. दिलीप धोंडगे, प्रा. प्रवीण बांदेकर, कृष्णात खोत, डॉ. एकनाथ पगार, आशुतोष पाटील, विरधवल परब, डॉ. अवनिश पाटील, मेघा पानसरे, गौतमीपुत्र कांबळे आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 FEB 2026

पुढारी

# क्रीडा महोत्सव खेळाडूंसाठी एक सुवर्णसंधी

## डॉ. ज्योती जाधव : शिव-स्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिव-स्पंदन क्रीडा महोत्सव खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय पातळी गाठण्याची सुवर्णसंधी आहे, असे प्रतिपादन प्रभारी प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये शिव-स्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचा क्रीडा महर्षी मेघनाथ नागेश्वर क्रीडा संकुलामध्ये झालेल्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.



**कोल्हापूर : शिव-स्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी प्रभारी प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. समवेत क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे, सिद्धार्थ शिंदे, ॲड. अभिषेक मिठारी आदी. (छाया : मिलन मकानदार)**

डॉ. जाधव म्हणाल्या, सर्व विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत मैदाने व खेळाडूंना लागणाऱ्या सर्व सोयीसुविधा देण्यात शिवाजी विद्यापीठ नेहमी अग्रेसर आहे. क्रीडा महोत्सवामुळे विद्यापीठाच्या खेळाडूंचे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करून यश मिळवत आहेत, याचा अभिमान आहे.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य ॲड. अजित पाटील, ॲड. अभिषेक मिठारी, श्वेता परुळेकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, संघटनेचे अध्यक्ष आनंद खामकर उपस्थित होते.

विद्यापीठाच्या ३४ वेगवेगळ्या विभागांमधील अडीच हजार खेळाडूंचा सहभाग क्रीडा स्पर्धेत आहे. सर्वच विभागाने संचालनामध्ये उत्साहाने सहभागी होऊन वेगवेगळ्या प्रेरणादायी थीम प्रात्यक्षिक सादर केली. संचालनाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील, डॉ. धनंजय पाटील, डॉ. राहुल मगदूम यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रा. सुचय खोपडे, प्रा. राम पवार, कुस्ती प्रशिक्षक कृष्णात पाटील, अथलेटिक्स प्रशिक्षक सुभाष पवार, योगा प्रशिक्षक मनीषा शिंदे उपस्थित होते.

### विविध स्पर्धांचा सहभाग

क्रीडा संचालनामध्ये खेळाडूंनी महिला सबलीकरण, आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग, क्रीडा क्षेत्रामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर, मोबाईलच्या युगामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. चार दिवस चालणाऱ्या क्रीडा महोत्सवामध्ये क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ, अथलेटिक्स, हॉलीबॉल, थ्रोबॉल, रस्सीखेच क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

25 FEB 2026

सकाळ



कोल्हापूर : येथे 'शिवस्पंदन' क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी व्ही. एन, शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

# खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळी गाठण्याची संधी : जाधव

## शिवस्पंदन क्रीडा महोत्सवास थाटात प्रारंभ

कोल्हापूर, ता. २४ : 'खेळाडूंना अद्ययावत मैदाने व आवश्यक सुविधा देण्या त विद्यापीठ अग्रेसर आहे. 'शिवस्पंदन'मुळे खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय स्पर्धात प्रतिनिधीत्व करून यश मि ळवले आहे. ही स्पर्धा म्हणजे आं तरराष्ट्रीय पातळी गाठण्याची संधी आ हे ,' असे मत शिवाजी विद्या पीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केले.

क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलात आयोजित 'शिवस्पंदन' वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बो ल त होत्या. डॉ. जाधव म्हणाल्या, 'मोबाईल व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या अतिवापरापासून वेळ काढून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात सहभाग घेत सदृढ बनावे.' चा र दिवस चालणाऱ्या महोत्सवात विद्यापीठाच्या ३४ विभागांतील अडीच ह जा र खेळाडू सहभागी होतील. सहभागी खेळाडूंनी महिला सबलीकरण, आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिलांचा वाढता सहभाग, क्रीडा क्षेत्रातील विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर, मोबाईल युगात शारीरिक शिक्षणाचे महत्त्व अशा प्रेरणादायी विषयांवर प्रात्याक्षिके सादर केली. महोत्सवात क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल, थ्रोबॉल आणि रस्सीखेच या क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, व्यवस्थापन समिती सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य ॲड. अजित पाटील, ॲड. अभिषेक मिठारी, श्वेता परुळेकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, आनंद खामकर, क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.